जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४८४ दिनांक - १६/११/२०२४**

खडकी पोलीस स्टेशन, पुणे शहर

# खडकी पोलीस स्टेशन कडून २,८१,२२०/- रु किं.चा गांजा व रिक्षा जप्त केलेल्या गुन्हयात फरार असलेला अब्राहिम यादव हा पोलीसांचे जाळयात

दि.०७/११/२०२४ रोजी खडकी पोलीस स्टेशन कडील मरीआई बीट मार्शल हे पेट्रोलिंग करत करत पुणे - मुंबई जुना हायवे वरील कामगार आयुक्तालयासमोर थांबलेल्या रिक्षा जवळून जात असताना त्यांना गांजाचा वास आला म्हणून त्यांनी रिक्षाची तपासणी केली असता त्यामध्ये बसलेला इसम अफजल सनाउल्ला सय्यद वय ३९ वर्षे, रा. सर्वे नं.२३०,सनराईज बेकरीच्या पाठीमागे,पुणे, मूळ गांव मु.पो. दिघीहाटी, ता.वेल्हा, जि.पुणे याचे ताब्यातुन **२,८१,२२०/- रु किं.चा ५ किलो ६३० ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ व रिक्षा जप्त** केली त्याबाबत **खडकी पोलीस स्टेशन गु.र.नं. ३१५/२०२४, एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८(क),२० (ब)ii(अ)** प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.परंतु त्याचे सोबत असलेला दुसरा आरोपी याला तेथून पळून जाण्यात यश आले. त्याचे नाव अटक आरोपी अफजल सय्यद याचे कडून अब्राहीम ऊर्फ अब्रहम नरेश यादव रा.कटरीया हॉस्पीटल समोर ताडी गुत्त्याच्या शेजारी,येरवडा,पुणे असे असल्याचे समजले परंतु त्याचा अनेक ठिकाणी शोध घेऊनही तो मिळून येत नव्हता शेवटी पो.हवा.आशिष पवार यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, अब्राहीम यादव हा येरवडया मध्ये एका पडक्या घरात लपून बसला आहे. मिळालेल्या बातमीनुसार त्या ठिकाणी छापा टाकून अखेर त्याला पकडण्यात पोलीसांना यश आले व तो पोलीसांचे जाळयात अडकला

सदरील कारवाई ही मा.पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ ४,पुणे शहर श्री.हिंमत जाधव, मा. सहा पोलीस आयुक्त,खडकी विभाग,पुणे श्रीमती अनुजा देशमाने यांचे मार्गदर्शनाखाली खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सतिश जगदाळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.गजानन चोरमले, पोलीस उपनिरीक्षक दिग्विजय चौगले, सहा.पोलीस उपनिरीक्षक राजू जाधव, पोलीस अंमलदार आशिष पवार, शिवराज खेड यांनी केली आहे.